# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक :- १८५-२२** **दिनांक :- १६/०६/२०२२**

## घरामध्ये चोरी करणाऱ्या महिला आरोपीतास अटक करुन १,९०,०००/- रुपये किं. चे दागिने हस्तगत- विरार पोलीस स्टेशनची कामगिरी.

दिनांक ०७/०६/२०२२ रोजीचे दुपारी १४:३० ते दिनांक ९/६/२०२२ रोजीचे १०:३० वाजताच्या सुमारास विरार पोलीस ठाणे हद्दीमधील गोकुळधाम सोसायटी, फुलपाडा विरार पुर्व येथील फिर्यादी यांच्या घरातील कोणीतरी अज्ञात चोरटयाने सोन्या चांदीचे दागिने चोरुन नेले होते. त्याबाबत फिर्यादी यांनी विरार पोलीस ठाणे येथे दिलेल्या तक्रारीवरुन दि १०/६/२०२२ रोजी गु.र.नं. ५६०/२०२२, भा.दं.वि.सं. कलम ३८० प्रमाणे दाखल करण्यात आला होता. सदर गुन्हयातील चोरीस गेलेला मुद्देमाल व अज्ञात आरोपीतास अटक करुन सदरचा गुन्हा उघडकीस आणण्याच्या दृष्टीने विरार पोलीस स्टेशनच्या गुन्हे प्रकटीकरण पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी लागलीच घटनास्थळास भेट देवून घटनास्थळावरुन तांत्रीक पुरावे हस्तगत केले. तसेच मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे फिर्यादी यांच्या घरातील व्यक्तींकडे कसोशिने विचारपुस केली असता घरातील महिलेनेच दागिने चोरी केले असल्याचे निष्पन्न झाल्याने सदर महिला आरोपीस दिनांक १२/६/२०२२ रोजी अटक करण्यात आली असून तिचेकडून गुन्हयात चोरीस गेलेले १,९०,०००/- रु. किंमतीचे सोन्याचे दागीने हस्तगत करण्यात आले आहे.

सदरची कामगिरी श्री. प्रशांत वाघुंडे, पोलीस उप आयुक्त, श्री. रामचंद्र देशमुख, सहाय्यक पोलीस आयुक्त यांच्या मार्गदर्शनाखाली विरार पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. सुरेश वराडे, पोनि. श्री दिलीप राख, गुन्हे प्रकटीकरण पथकातील पोलीस उपनिरीक्षक संदेश राणे, पो. हवा. सचिन लोखंडे, संदिप शेरमाळे, पो.ना. हर्षद चव्हाण, पो.शि. इंद्रनिल पाटील, विशाल लोहार, रवी वानखेडे, सुनिल पाटील, युवराज वाघमोडे, सागर घुगरकर यांनी केली आहे.


महाराष्ट्र पोलीस
विरार पोलीस ठाणे
विरार पोलीस ठाणे
विरार पोलीस ठाणे